ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख ७ जून, १९६१ | अंक ११

## विविध माहिती

**१,८०० शिक्षकांची नेमणूक**—पंजाब सरकारनें राज्यांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याची योजना अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. त्यामुळें शाळेंत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्या मुलांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय चांगली व्हावी म्हणून राज्य सरकारनें १,८०० नव्या प्राथमिक शिक्षकांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे.

**भूदानयज्ञांत मिळालेली जमीन** — आसाममधील एका प्रार्थना-सभेंत भाषण करतांना आचार्य विनोबा भावे ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, आतांपर्यंत देशांत भूदानयज्ञांत ४५ लाख एकर जमीन मिळविण्यांत आली आहे. आचार्य भावे गेलीं दहा वर्षें भारतामधील निरनिराळ्या राज्यांत पायीं प्रवास करून दलितांच्या उद्धारासाठी जमीन व मालमत्ता गोळा करीत आहेत.

**महारोगाविरुद्ध मोहीम** — महाराष्ट्र सरकारनें महारोगाविरुद्ध उघडलेल्या मोहिमेंत सातारा जिल्ह्यांत १३ सामाजिक कार्यकर्ते आणि २ सरकारी डॉक्टर्स सामील झाले आहेत. त्यांनीं आतांपर्यंत १८० खेडेगांवांतील ५,००० महारोग्यांना उपचार करून घेण्यास प्रवृत्त केलें आहे सरकारच्या मोहिमेला चांगली साद मिळत असून अधिकाधिक रोगी उपचारासाठी पुढें येत आहेत.

**साखर कारखान्यांचा हंगाम**—मालेगांव सहकारी साखर कारखान्याचा चालू हंगाम संपला आहे. त्यामुळें ऊस तोडून त्याची वाहतूक करणारीं ८० कुटुंबें बेकार झालीं आहेत. हीं सर्व कुटुंबें अहमदनगर व बीड जिल्ह्यांतून हंगामी कामासाठी आलीं होतीं. आतां तीं परत जात आहेत. उसाची तोडणी करणें, त्यांच्या मोळ्या बांधणें इत्यादि कामें करण्यांत हीं कुटुंबें तरबेज आहेत.

**विजेच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम**—पश्चिम बंगालमधील तागाच्या ८० गिरण्यांपैकी ९ गिरण्यांवर विजेच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळें अनिष्ट परिणाम झाला आहे. त्यामुळें २५,००० कामगारांना रोजगाराला मुकावें लागलें. १५,००० कामगारांना रोजीं ५ तास कमी काम मिळेल गिरण्यांच्या मालकांनीं कामगारांना त्याबद्दल नुकसानभरपाई दिली. एंजिनिअरिंगच्या धंद्यावरहि अपुऱ्या वीज-पुरवठ्याचा परिणाम झाला आहे.

**टेलफोन्ज तयार करण्याचा कारखाना** भारतामधील टेलिफोनची मागणी एकसारखी वाढत चालली आहे. पण त्या मानानें टेलिफोन्सचें उत्पादन कमी पडत आहे. टेलिफोन्सची गरज भागविण्यासाठी आणखी एक टेलिफोन्सचा कारखाना काढण्याचा विचार सरकार करीत आहे अशी माहिती मध्यवर्ती सरकारच्या वाहतूक व दळणवळण खात्याच्या मंत्र्यांनीं सांगितली आहे.

**आदिवासींच्या हितासाठी योजना** —मध्यप्रदेशांतील बस्तार जिल्ह्यांतील आदिवासी लोकांची स्थिति सुधारण्यासाठी राज्य सरकारनें एक मोठी योजना आखली आहे. ह्या योजनेंत स्वतःची जमीन नसलेल्या आदिवासींना जमीन देण्यावर विशेष भर देण्यांत येणार आहे. चालू वर्षांत आदिवासींना ३५,००० एकर जमीन वांटण्यांत येईल.

**अणुबाँब स्फोटापासून संरक्षण** — अणुबाँबच्या स्फोटापासून संरक्षण व्हावें म्हणून रशियन सरकार मोठ्या प्रमाणावर आश्रयस्थानें बांधीत आहे. स्फोटापासून व नंतर पडणाऱ्या विषारी धूलिकणापासून संरक्षण व्हावें म्हणून ह्या आश्रयस्थानावर ५० ते १५० कोटी डॉलर्स इतकी रक्कम खर्च करण्यांत येत आहे.

**आयुर्विम्याचा धंदा वाढविण्यासाठी**—आयुर्विम्याचा धंदा वाढविण्याच्या हेतूनें विमा कॉर्पोरेशनचे ४०० अधिकारी मुंबईत घरोघर हिंडून माहिती गोळा करणार आहेत. मुंबईप्रमाणेंच कलकत्त्यालाहि अशीच माहिती गोळा करण्यांत येणार आहे. दोन्ही शहरांत १ लाख कुटुंबांत जाऊन त्यांची विम्याबद्दलची माहिती मिळविण्यांत येईल. १९६० मध्यें मुंबई व कलकत्ता विभागांत प्रत्येकी ७५ कोटींचा धंदा मिळविण्यांत आला आहे.

**बेकारीकडे अधिक लक्ष द्या**—लोकसभेच्या कॉंग्रेस पक्षांतील सर्वोदय गटानें भारताच्या नियोजन समितीला ग्रामीण भागांतील बेकारीकडे तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अधिक लक्ष द्यावें अशी सूचना केली आहे. ग्रामीण भागांत बांधबंदिस्तीची व छोट्या पाटबंधाऱ्यांचीं कामें काढण्यांत आलीं तर बेकारीला थोडाबहुत आळा बसेल असें ह्या गटाचें म्हणणें आहे.

**तीन औद्योगिक वसाहती**—अहमदनगर जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या तीन औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचें महाराष्ट्र राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या वसाहती श्रीरामपूर, कोपरगांव व अहमदनगर येथें उभारण्यांत यावयाच्या आहेत. सर्व वसाहतींनीं जरूर तें भाग-भांडवल जमविलें असून त्यांच्या जागाहि निश्चित करण्यांत आल्या आहेत. ह्या वसाहतींतून ३०० छोटेखानी उद्योगधंदे काढण्यांत येणार आहेत.

**संस्कृतच्या शाळेची स्थापना**—मध्यप्रदेशांत दुर्गा सिद्धपीठ संस्कृत महाविद्यालय नांवाची संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. संस्थेच्या इमारतीच्या पायाचा दगड नुकताच बसविण्यांत आला. महाविद्यालयासाठी बांधण्यांत यावयाच्या इमारतीसाठी १ लाख रुपये खर्च येणार आहे. संस्कृत विद्येचा विकास व्हावा म्हणून मध्यप्रदेश सरकारनें माध्यमिक शाळांत संस्कृत हा सक्तीचा विषय केला आहे.

SCHEDULE

## Form of Declaration

**FORM I. ( See Rule 3 ).**

I. *Shripad Vaman Kale* declare that I am the Printer and Publisher of the newspaper entitled **Artha**, to be printed at *Aryabhushan Press, Poona 4*, that particulars in respect of the said newspaper given here under are true to the best of my knowledge and belief.

| | |
|---|---|
| 1. Title of the Newspaper. | **Artha** |
| 2. Language (S) in which it is (to be) published. | **Marathi** |
| 3. Periodicity of its publication. | |
| (a) Whether a daily, triweekly, biweekly, weekly, fortnightly, or otherwise. | **Fortnightly** |
| (b) In the case of a daily, please state whether it is a morning or evening newspaper. | ... |
| (c) In the case of newspaper other than a daily, please state the day (s)/date (s) on which it is ( to be ) published | **1st and 3rd Wednesday of every month** |
| 4. Retail selling price of the newspaper per copy. | ... |
| (a) If the newspaper is for free distribution, please state that it is for free distribution. | **No.** |
| (b) If it has only an annual subscription and no retail price, please state the annual subscription. | **Rs. 6/- only** |
| 5. Publisher's name. | **Shripad Vaman Kale** |
| Nationality. | **Indian** |
| Address. | **823, Shivajinagar, Poona 4** |
| 6 Place of publication (Please give the complete postal address). | **823, Shivajinagar, Poona 4** |
| 7. Printer's name. | **Shripad Vaman Kale** |
| Nationality | **Indian** |
| Address. | **823, Shivajinagar, Poona 4** |
| 8. Name (s) of the printing press (es) where printing is to be conducted and the true and precise description of the premises on which the press (es) is/are installed.* | **Aryabhushan Press, Shivajinagar, Poona 4** |
| 9. Editor's name. | **Shripad Vaman Kale** |
| Nationality. | **Indian** |
| Address. | **823, Shivajinagar. Poona 4** |
| 10 Owner's name (s). | **Shripad Vaman Kale** |
| (a) Please state the particulars of individual (s) or of the firm, Joint Stock Company, trust, co-operative society or association which owns the newspaper. | **Individual** |
| (b) Please state where the owner owns any other newspaper and its name, periodicity, language and place of publication. | **Nil** |
| 11. Please state whether the declaration is in respect of :— | |
| (a) a new newspaper, or | ... |
| (b) an existing newspaper. | **Yes** |
| (c) in case the declaration falls under item (b) the reason for filling the fresh declaration. | **Due to change of periodicity and change of printer** |

Date—*19-5-1961.*

Signature **S. V. Kale**
Name (in block latterss)
**Shripad Vaman Kale**
Designation Editor

* Strike out whatever is not applicable.

*Note*:—Separate declarations should be filed by the Printer and the Publisher unless the Printer and the Publisher is the same person.


## Brihan Maharashtra College of Commerce, Poona 4.

The College will re-open for the year 1961-62 on 20th June 196 . Admission forms can be had from the College Office for the Pre-Degree F. Y. B. Com., S. Y. B. Com. an M. Com. during office hours. (11 to 4 p. m.)

Arts Graduates will be admitted to S.Y.B.Com. Class under University Ordinance 175-A. They will have to appear for Ten papers only,

PRINCIPAL.

गेलीं सतत तीस वर्षे लोकसेवेच्या आघाडीवर
ठेवीदारांचे विश्वासास पूर्णपणें पात्र झालेली व शेअर होल्डर्सना योग्य मोबदला देणारी

# दि बेळगांव बँक लिमिटेड

हेड ऑफिस—बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल मांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० चे वर |

बँक कॉल डिपॉझिट व अल्प मुदतीच्या ठेवी, आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.

समक्ष चौकशी करा.

होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर द. द. ३ टक्के व्याज.
एक ते पांच वर्षे मुदतीच्या ठेवीचे व्याजाचे दर द. द. ३¾ ते ४½

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ७ जून, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांतील ठेवींच्या विम्यासाठी विधेयक

बँकांतील ठेवीदारांचे हितसंबंध सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने, देशांतील व्यापारी बँकांची स्थिति बळकट करण्याकरितां कांहीं उपाययोजना करण्यासंबंधीं भारत सरकार गेला कांहीं काळ विचार करीत होतें. या हेतूने, परिस्थिति खालावलेल्या बँकांच्या बाबतींत ऋणमुक्तीबाबतची घोषणा करण्यास परवानगी देण्यासाठी आणि इतर बँकांत त्या विलीन करतां याव्यात वा त्यांची पुनर्घटना करणें शक्य व्हावें म्हणून गतवर्षी कायदा करण्यांत आला. या कायद्यान्वयें मिळालेल्या अधिकारान्वयें, परिस्थिति अधिक खालावलेल्या बँकांच्या स्थितीचा आढावा घेण्यांत येत असून त्यांपैकी कांहीं बँका तर मोठ्या व्यापारी बँकांत विलीनहि करण्यांत आलेल्या आहेत.

आर्थिक दृष्ट्या खालावलेल्या बँकांची पुनर्घटना, विलीनीकरण केल्यानें व अन्य कांहीं कारणानें अशा बँकांतील ठेवीदारांना होणारा त्रास टाळावा किंवा तो कमींत कमी व्हावा याकरतां बँकांतील ठेवींचा विमा उतरविण्याची योजना सुरू करावी अशी सूचनाहि वरील उपायांच्या जोडीस वेळोवेळीं पुढें मांडण्यांत आलेली आहे. भारत सरकारनें या प्रश्नाच्या विविध बाजूंचा विचार करून आणि रिझर्व्ह बँक आणि बँक जगतांतील पुढारी यांच्याशीं विचारविनिमय करून अशी एखादी योजना तत्काळ अंमलांत आणण्याकरितां सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या दृष्टीनें एक विधेयक तयार करण्यांत येत असून, तें पुढील अधिवेशनांत मांडण्याचा सरकारचा विचार आहे.

## सार्वजनिक मालकीच्या विभागांत औषधाचे कारखाने

रशिआच्या मदतीनें भारतांत औषधें तयार करण्याचे सार्वजनिक मालकीचे ४ कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी दोन कारखान्यासंबंधींचे तपशीलवार अहवाल रशिअन तज्ज्ञांकडून भारत सरकारकडे आले आहेत. त्यांपैकीं एक कारखाना उत्तर प्रदेशांत हृषीकेश येथें काढण्यांत यावयाचा आहे. दुसरा केरळमध्यें काढण्यांत यावयाचा असून त्यासाठी देशांतील औषधी वनस्पतींचा उपयोग करण्यांत येणार आहे. ह्याशिवाय हैदराबादजवळ सनतकुमार ह्या ठिकाणीं एक कारखाना व मद्रासजवळ वैद्यकीय उपकरणांचा व हत्यारांचा कारखाना काढण्यांत येणार आहे. परंतु त्यांचे अहवाल अद्याप हातीं आलेले नाहींत. ह्या सर्व कारखान्यांची उभारणी करण्यासाठी इंडिअन ड्रग्ज अँड फार्मास्यूटिकल्स लि. ह्या नांवाची एक कंपनी स्थापन करण्यांत आली आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १५ कोटी रुपये आहे. सर्व कारखान्यांना मिळून ४० कोटी रुपयांचें भांडवल लागेल. कारखान्यांसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनाची गरज भागविण्यासाठी रशिअन सरकारनें ८ कोटी रुबल्सचें कर्ज मंजूर केलेलें आहे. रुपयांच्या चलनांत त्याची किंमत ९.५ कोटी रुपये होते. रशिया कारखान्यांच्या उभारणीच्या कामी तांत्रिक मदत देणार आहे, हिंदी तंत्रज्ञ शिकवून तयार करणार आहे आणि जरूर ती यंत्रसामग्रीहि पुरविणार आहे. कारखान्यासाठी लागणारी जमीन सरकारनें ताब्यांत घेतली असून संचालकाची नेमणूकहि केली आहे. १९६४ च्या सुमारास सर्व कारखान्यामधून प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. हृषीकेश येथील कारखान्यांत पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसीन, इत्यादि औषधें तयार करण्यांत येतील. सनतकुमार येथील कारखान्यांत दरसाल ८५० टन सल्फा औषधें तयार करण्यांत येतील.

---

## पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणी चालू होणार

मध्यप्रदेशांत पन्ना ह्या ठिकाणीं हिऱ्यांच्या खाणी आहेत. त्या चालविण्यासाठी भारत सरकारनें नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचें सहकार्य घेतलें आहे. कॉर्पोरेशनच्या उभारणीसाठी १.५ कोटी रुपये भांडवल लागेल. पन्ना येथील हिऱ्याच्या खाणी म्हणजे ह्या क्षेत्रांतील भारताचें पहिलें पाऊल आहे. शिवाय ह्या खाणी मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचा प्रयत्न करतील. खाणींतील सध्यांचें उत्पादन बेताचेंच आहे. पन्ना विभागांतील २७ चौरस मैलाच्या प्रदेशांत कॉर्पोरेशनतर्फे हिऱ्यांचा शोध करण्यांत येणार आहे. सुमारें एक चतुर्थांश चौरस मैलाच्या एका भागांत हिरे निश्चितपणें सांपडतील अशी खात्री तज्ज्ञांना वाटत आहे. पन्ना विभागांत असलेल्या भूमिगत थरांपैकी फक्त दोन थरांतील हिरे काढण्याचें कामच तूर्त हातीं घेण्यांत येणार आहे. १९६३ अखेरपर्यंत खाणीचा विकास करण्याचें काम पूर्ण होईल. तोपर्यंत दरसाल ४० ते ५० हजार कॅरेटस वजनाचे हिरे निघूं लागतील असा अंदाज आहे. एका थरामधून दरसाल १२,००० कॅरेटस वजनाचे हिरे निघतील. त्यांपैकीं बहुतेक अलंकारांत वापरतां येण्यासारखे असतील. सुमारें ६० ते ७५ टक्के हिरे ह्या प्रकारचे असतील आणि बाकीचे औद्योगिक उपयोगाचे असतील. भारतांत हिऱ्यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें म्हणजे मग त्यांना पैलू पाडण्याचा व चकाकी आणण्याचा धंदाहि चालू होण्याची शक्यता आहे. भारतांत अजूनहि दागिन्यासाठी हिऱ्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यांत येतो. तेव्हां उत्पादित हिऱ्यांना बाजारपेठ लाभणें फारसें कठीण जाणार नाहीं, असा अंदाज आहे. कॉर्पोरेशन हिऱ्यांच्या विक्रीसाठी स्वतःचीच संघटना उभारण्याचा विचार करीत आहे.

---

## कोर्ट कचेरीच्या कामासाठी मोफत मदत

पूर्वीच्या मुंबई सरकारनें हरिजन व इतर मागासलेल्या जाती ह्यांना कोर्ट कचेरीच्या कामी मोफत कायदेशीर मदत देण्यास प्रारंभ केला होता. नव्या गुजरात सरकारनें ही योजना १९६१–६२ सालांतहि चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. गुजरातमधील सर्व जिल्ह्यांतील संबंधितांना कांहीं अटींवर अशी मदत मिळूं शकेल.

## भारतामधील बाजारपेठेची नाडीपरीक्षा

अमेरिकेंतील एक व्यापारी तज्ज्ञ मि. गॉर्डन बार्नवेल हे नॅशनल प्रॉडक्टिव्हिटी कौन्सिलवर काम करीत आहेत. मुंबई येथें भारतामधील बाजारपेठेसंबंधी त्यांचें नुकतेंच एक व्याख्यान झालें. बाजारपेठेच्या स्वरूपाचें निदान करतांना ते म्हणाले कीं, भारतामधील बाजारपेठेची गुरुकिल्ली स्त्रियांच्या हातीं आहे, ही गोष्ट लक्षांत घेतली तर ह्या देशांत माल विकणें ही अतिशय सोपी गोष्ट आहे. म्हणून कारखानदारांनीं स्त्रियांच्या मागण्यांकडे लक्ष देऊन उत्पादन करूं लागावें. जाहिरातदारांना अयोग्य जाहिरातीवर नजर ठेवण्यासाठी एक निरीक्षण समिति नेमावी. म्हणजे अशा जाहिरातींना आळा बसेल आणि गिऱ्हाइकांनाहि प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींबद्दल विश्वास वाटूं लागेल

—

## कंपनी सेक्रेटरीसाठी परीक्षा

कंपनी सेक्रेटरीसाठी पुढील प्रिलिमिनरी आणि इंटरमीजिएट परीक्षा ऑक्टोबर, १९६१ मध्यें घेण्यांत येईल या परीक्षांना बसण्यासाठी करावयाचे अर्ज ३१ जुलै, १९६१ पूर्वी डिपार्टमेण्ट ऑफ कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनकडे सादर करावेत. या परीक्षा पूर्वीप्रमाणेंच मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास, अर्नाकुलम् आणि हैदराबाद येथें घेण्यांत येतील.


## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील बंदर-सुधारणा

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत दक्षिण भारतामधील तुतिकोरीन आणि मंगलोर ह्या बंदरांची सुधारणा करून तीं मोठीं करण्यांत येणार आहेत ह्या कामासाठी १० कोटी रुपयांची रक्कम वेगळी काढून ठेवण्यांत आली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत बंदरांच्या विकासासाठी ११० कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्यांपैकी २५ कोटी रुपये फराका धरणावर खर्च व्हावयाचे असून बाकीची रक्कम कलकत्ता, मद्रास, मुंबई, कांडला व कोचीन ह्या मोठ्या बंदरांवर खर्च करण्यांत येणार आहे. मंगलोर बंदरांतून दरसाल २० लाख टन लोखंडाचें खनिज निर्यात करतां यावें म्हणून ह्या बंदराची वाढ करणें अगत्याचें झालें आहे. हें खनिज मुख्यत: चित्रदुर्ग भागांत सांपडतें. ह्या कामासाठी अवश्य असणाऱ्या तांत्रिक पाहणीस प्रारंभ झाला आहे.

—


## लोणावळ्याच्या चिक्कीला परदेशांत मागणी

लोणावळ्याच्या चिक्कीवर परदेशी पाहुणे खूष होऊन ती परदेशांत जाऊं लागली आहे. ग्रेट ब्रिटन व अमेरिका येथून ऑर्डरी येऊं लागल्या आहेत. लोणावळा येथील एका फर्मनें निर्गत वाढविण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्रीनें सुसज्ज असा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी श्री. मोतिलाल अगरवाल हे लवकरच जपानला जाणार आहेत.

... सेवेसी तत्पर हजर

शहरांतील ड्रेनेज खातीं, पूलाचा पाया, पूरग्रस्त जमीन अगर जमीनीचें उत्खनन यांवर कामें करणारे कॅंट्राक्टर (ठेकेदार) यांना पूर्वी जमीनींतील घाणेरडे पाणी काढून टाकणें हे अत्यंत जिकीरीचे काम होते. परंतु आतां किर्लोस्कर सेल्फ प्रायमिंग पंप त्यांच्या सेवेस सदैव तत्पर हजर आहे. जमीनींतील पाणी काढून टाकणे म्हणजे त्यांच्या हातचा मळ आहे.



किर्लोस्कर

सेल्फ प्रायमिंग पम्प

किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली.

STUSA KM7 60

## अमेरिकेच्या पी. एल्. ४८० मदतीचा विनियोग

१९५४ सालीं युनायटेड स्टेट्स कॉंग्रेसनें दि ॲग्रिकल्चरल ट्रेड डेव्हलपमेंट असिस्टन्स ॲक्ट मंजूर केला; पब्लिक लॉ ४८० ह्या नांवानें तो प्रसिद्ध आहे. ह्या कायद्यान्वयें अमेरिकन सरकारनें भारत सरकारशीं पांच करार केलेले आहेत. त्यांस अनुसरून, भारताला अमेरिकेनें पुरविलेल्या मालाची रुपयांत होणारी किंमत अधिक आगबोट वाहतुकीचें निम्में भाडें एवढी रकम भारतांत एका खास खात्याकडे वर्ग केली जाते. त्यांतून भारत सरकारला कर्जे व देणग्या दिल्या जातात. पब्लिक लॉ ४८० ला केलेल्या दुरुस्तीप्रमाणें ( कूले अमेंडमेंट ) हा खास खात्यांतून कांहीं रकमा भारतांतील अमेरिकन फर्म्स व त्यांच्याशीं संबंधित फर्म्स ह्यांना कर्जाऊ देतां येतात.

अशा रीतीनें, एकूण १,०९६ कोटी रुपयांपैकी ५६३ कोटी रुपये भारत सरकारला कर्जे म्हणून आणि ५१० कोटी रुपये ग्रँट म्हणून मंजूर झाले आहेत. अमेरिकेसाठी म्हणून १४१ कोटी रुपये राखून ठेवून, कूले अमेंडमेंटप्रमाणें ७७ कोटी रुपये देण्यांत आले आहेत.

एकूण २१ उपक्रमांना पी. एल्. ४८० खालीं रकमा मिळाल्या आहेत. त्यांतील प्रमुख उपक्रम :—

| | कोटी रु. |
|---|---|
| रीफायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | २६.२० |
| चंबळ प्रॉजेक्ट | १३.०४ |
| दामोदर व्हॅली प्रॉजेक्ट | ११.३९ |
| नागार्जुनसागर प्रॉजेक्ट | ८.९९ |
| कोसी प्रॉजेक्ट | ७.७८ |
| कोयना प्रॉजेक्ट | ११.४९ |
| इं. फायनान्स कॉर्पोरेशन | १०.०० |
| इं. क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन | १०.०० |

डेव्हलपमेंट लोन फंडांतून भांडवल पुरविण्यांत येणाऱ्या कांहीं उपक्रमांच्या रुपयांतील खर्चासाठी ७८ कोटी रु. पी. एल्. ४८० फंडांतून उपलब्ध करून देण्यांत आले आहेत.

कूले अमेंडमेंटखालीं खालील कंपन्यांना कर्जे देण्यांत आलीं आहेत:—

| | लक्ष रु. |
|---|---|
| ओटिस एलेव्हेटर | १० |
| गुड्इअर टायर | २२५ |
| म्हैसूर सिमेंट्स | ५५ |
| सिंथेटिक्स अँड केमिकल्स | ३९२ |
| हिंदुस्थान ॲल्युमिनिअम | १०० |
| मार्क शॉर्प अँड धोम | ५० |
| एक्स सेल-ओ | २० |
| शेषशायी ब्रदर्स | २०० |
| प्रीमियर टायर्स | ३० |
| लेडर्ले लॅबोरेटरीज् | २५ |

हीं सर्व कर्जे ७३ सहामाही हप्त्यांनीं ४० वर्षांत परत फेडावयाचीं असून त्यांवर व्याज ३% ते ४% राहील.

## १० हजारांवरील प्राप्तीवर कर भरणारे

१९५९–६० मध्यें, १०,००० रुपयांपेक्षा अधिक उत्पन्नावर ज्यांचेकडून प्राप्तिकर आकारण्यांत आला, अशांची राज्यवार वांटणी खालीं दिली आहे. त्यावरून दिसून येईल, कीं, त्यांपैकी ४०% लोक त्या वेळच्या मुंबई राज्यांतील आहेत.

| | |
|---|---|
| मद्रास | १३,७९८ |
| मुंबई | ७७,४९८ |
| प. बंगाल | ३४,६६९ |
| उत्तर प्रदेश | १०,३४५ |
| पंजाब | ५,२७७ |
| मध्यप्रदेश | ४,००९ |
| बिहार | ४,७९९ |
| ओरिसा | ९७० |
| आसाम | ३,२०८ |
| आंध्र | ७,४९६ |
| म्हैसूर | ६,८५७ |
| केरळ | ३,९८५ |
| राजस्थान | ३,५०७ |
| जम्मू-काश्मीर | ८६१ |
| दिल्ली | १३,८१५ |
| हिमाचल प्र. | ४९ |
| त्रिपुरा | १४९ |
| मणिपूर | ४७ |
| अंदमान-निकोबार | १६ |

## दलाई लामाची भांडवल-गुंतवणूक

बिहारमध्यें हजारीबाग ह्या ठिकाणीं लोखंडाचे नळ तयार करण्याचा एक कारखाना आहे. ह्या कारखान्यांत दलाई लामा व त्याचे स्नेही ह्यांनीं मिळून १५ लाख रुपये भांडवल गुंतविलें आहे. कारखान्याचें अधिकृत भांडवल १ कोटी रुपये असून त्यांपैकी ४० लाख रुपये वसूल भांडवल आहे. कारखान्यासाठी लागणारें परदेशीय चलनांतील भांडवल दलाई लामानें पुरविलेलें आहे. दलाई लामाचें भांडवल १० वर्षे तरी भारतामधून बाहेर पाठविलें जाणार नाहीं. भांडवलावरील नफ्याचा उपयोग तिबेटमधून भारतांत आश्रयार्थ आलेल्या निर्वासितांच्या हितासाठी करण्यांत येणार आहे.

## सावकार आणि रिझर्व्ह बँक

देशांतील सावकारी बँकिंगशीं जोडून घेण्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेनें आपलें धोरण पुनः जाहीर केलें आहे. (१) सावकारांनीं आपले बँकिंगचे व्यवहार इतर व्यवहारांपासून स्वतंत्र करावे, (२) त्यांनीं आपल्या बँकिंग व्यवहाराचे हिशेब ऑडिट करून घ्यावेत व (३) रिझर्व्ह बँकेची देखरेख व तपासणी त्यांनीं मान्य करावी, अशा रिझर्व्ह बँकेच्या तीन अटी आहेत. बॉंबे श्रॉफ्स असोसिएशननें ह्यासंबंधीं तपशीलवार म्हणणें मांडावें, असें तिला सांगण्यांत आलें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भारताला भेट देणारे परदेशी प्रवासी

### सन १९६० मध्यें १,२३,०९५ प्रवाशांची भेट

भारताला भेट देणाऱ्या हौशी प्रवाशांच्या संख्येंत उत्तरोत्तर वाढ होत असून, १९६० मध्यें आतांपर्यंतच्या कोणत्याहि वर्षापेक्षा अधिक, म्हणजे एकूण १,२३,०९५ परदेशी प्रवाशांनीं (यामध्यें पाकिस्तानी नागरिकांचा अंतर्भाव नाहीं) भारताला भेट दिल्याचें सरकारच्या आंकडेवारीवरून दिसून येतें. १९५९ मध्यें १,०९,४६४ प्रवाशांनीं भारताला भेट दिली होती. याचा विचार करतां प्रवाशांच्या संख्येंत १९६० मध्यें १२·५ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येतें.

भारताला भेट दिलेल्या या प्रवाशांपैकीं युरोपमधून ३०·२ टक्के, दक्षिण आणि आग्नेय आशियांतून २६·४ टक्के, अमेरिका आणि कॅनडामधून २३·३ टक्के, आफ्रिकेमधून ११·७ टक्के, प. आशियामधून ५·५ टक्के आणि २·९ टक्के इतर देशांतून आले होते.

सन १९६० मध्यें आलेल्या प्रवाशांपैकीं ६१·२टक्के विमानमार्गें, ३२·८ टक्के समुद्रमार्गें आणि ६ टक्के खुष्कीच्या मार्गें भारतांत आले.

या प्रवाशांपैकीं मुंबई बंदरांत आणि विमानतळावर ३· टक्के, कलकत्ता येथें १९ टक्के, दिल्ली विमानतळावर १८ टक्के, मद्रास येथें ९ टक्के प्रवासी उतरले.

सन १९६० मध्यें भारतांत उतरलेल्या परदेशी प्रवाशांनीं येथें एकूण ४३·१ लक्ष रात्री घालविल्या.

सन १९६० मध्यें भारतांत कोणत्याहि दिवशीं सरासरी ११,९०० परदेशी प्रवासी होते.

---

### तंबाखूचें प्रचंड उत्पादन

भारतांत प्रतिवर्षी ९ लाख एकर प्रदेशांत तंबाखूची लागवड होऊन त्यापासून ७० कोटी रत्तल उत्पादन होतें. तंबाखूच्या उत्पादनांत भारताचा जगांत तिसरा क्रमांक लागतो. पहिले दोन क्रमांक अमेरिका व चीन यांचे आहेत. तंबाखूच्या या उत्पादनापासून भारतांतील शेतकऱ्यांस प्रतिवर्षी ५० कोटी रुपये उत्पन्न होते, तर सरकारला तंबाखूच्या निर्यातींतून १५ कोटी रुपयांचें परकीय चलन आणि अबकारी कर, शेतकी कर व जकात उत्पन्न यांपासून आणखी ५० कोटी रुपये मिळतात. भारतांतील तंबाखूची सुमारें पन्नास देशांत निर्यात होते. १९५९–६० मध्यें एकूण १४ कोटी रुपये किंमतीच्या ८·८ कोटी रत्तल तंबाखूची निर्यात झाली. देशी तंबाखूच्या उत्पादनापैकी ८० टक्के तंबाखूचा देशांतच विड्या, सिगारेटी, चिरूट, हुक्का, तपकीर, इत्यादींसाठी वापर केला जातो. देशांतील सिगरेटींचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे. १९५२–५३ मध्यें हें उत्पादन १८०० कोटी होतें. हा आंकडा १९५९–६० मध्यें ३२०० कोटींवर गेला आहे.

---

### आधुनिक सीतेचें टेनिस कोर्टावरील स्वयंवर

जोधपूरपासून ४५ मैलांवर असलेल्या पाली ह्या ठिकाणीं सिरोहि येथील एका घरंदाज कुमारीनें टेनिसच्या सामन्यांत पराभूत होऊन, विजेत्याच्या गळ्यांत माळ घातली! एका सरकारी तरुण अधिकाऱ्याशीं तिनें सामना ठरविला आणि हरणारानें जिंकणाराला काय द्यावयाचें, हेंहि ठरलें. उभयतांचा सामना पाहावयास ५० प्रेक्षक उपस्थित होते. तरुणानें सामना जिंकून तरुणीलाहि जिंकलें! प्रेक्षकांना चहा देण्यांत येऊन त्यांचे आशीर्वाद घेण्यांत आले.

### उत्पादनशक्तीचा अपुरा वापर

भारतांतील कारखान्यांच्या उत्पादनशक्तीच्या मानानें प्रत्यक्ष उत्पादन फारच कमी होत आहे. खालील तक्त्यांतील उद्योगांपैकी एकतृतीयांशांचे बाबतींत उत्पादनशक्तीच्या मानानें ६०% सुद्धां उत्पादन होत नाहीं, असें दिसून येईल. आयातीवरील बंधनांमुळें उत्पादनशक्ति पडून आहे; इतरहि त्या परिस्थितीला कारणें आहेत.

१२१ धंद्यांच्या उत्पादनाचें एकूण उत्पादनशक्तीशीं प्रमाण : १९५९–६० चे आंकडे.

| उत्पादनशक्तीशीं प्रमाण % | उत्पादनशक्तीचा आधार २ किंवा ३ पाळ्या | १ पाळी | एकूण |
|---|---|---|---|
| | —उद्योगधंद्यांची संख्या— | | |
| १५० चे वर | १ | ४ | ५ |
| १०० ते १५० | ७ | १६ | २३ |
| ९० ते १०० | ४ | ७ | ११ |
| ८० ते ९० | ७ | १० | १७ |
| ७० ते ८० | ४ | ६ | १० |
| ६० ते ७० | — | १५ | १५ |
| ५० ते ६० | — | १० | १० |
| ४० ते ५० | २ | १५ | १७ |
| ० ते ४० | २ | ११ | १३ |
| एकूण | २७ | ९४ | १२१ |

---

### मुलामुलींच्या सहशिक्षणाला विरोध

शाळेमधील मुलामुलींच्या सहशिक्षणाला केरळ स्टेट एज्युकेशन बोर्डानें आपला विरोध व्यक्त केला आहे. केरळमधील शिक्षणपद्धतींत सुधारणा सुचविण्यासाठी राज्य सरकारनें बोर्डाची स्थापना केली होती. माध्यमिक शालेय शिक्षणानंतर मुलांना व मुलींना शिक्षण देणाऱ्या शाळा वेगवेगळ्या असाव्यात अशी शिफारस बोर्डानें केला आहे. त्याचप्रमाणें मुलांच्या शाळेंत पुरुष शिक्षक व मुलींच्या शाळेंत स्त्रीशिक्षकच शक्यतों नेमण्यांत यावेत असें मत बोर्डानें व्यक्त केलें आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांची गर्दी हटविण्यासाठी सकाळीं ८ ते १२ मुलांचे वर्ग भरविण्यांत यावेत आणि दुपारीं १ ते ५ पर्यंत मुलींचे वर्ग भरविण्यांत यावेत, अशी शिफारस करण्यांत आली आहे.

---

### औद्योगीकरणाच्या सामाजिक परिणामांचा अभ्यास

१९६२ च्या मे महिन्यांत कॅनडामध्यें एक अभ्यास परिषद् भरविण्यांत येणार आहे. ह्या परिषदेंत कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांचे प्रतिनिधी भाग घेणार असून औद्योगीकरणाच्या सामाजिक परिणामांचा तींत खास अभ्यास करण्यांत येणार आहे. भारतानें परिषदेंत भाग घेण्याचें ठरविलें आहे. भारतातर्फे १५ प्रतिनिधी परिषदेला पाठविण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं १० प्रतिनिधी कारखानदार व कामगार ह्यांचे मिळून असतील व बाकीचे ५ सार्वजनिक मालकीच्या आर्थिक विभागांतील असतील. परिषदेचे अध्यक्ष म्हणून ड्यूक ऑफ एडिंबरो हे काम करणार आहेत.

---

### रेल्वेजचें नुकसान

विगर–तिकीट प्रवास, कमी वजन लावणें, चोऱ्या, गळती, इत्यादींमुळें हिंदी रेल्वेजचें सालिना ५० कोटी रुपयांचें नुकसान होतें.

### व्यापारी नौकादलांत तीन बोटींची भर

भारत सरकारनें खाजगी बोटकंपन्यांना तीन बोटी विकत घेतां याव्या म्हणून १०,९०,००० पौंडांचें परदेशीय चलन मंजूर केलें. रुपयाच्या चलनांत ही रक्कम १·५ कोटी रुपये होते. ह्या तीन बोटींपैकी एक बोट नवीन असेल. ती युगोस्लाव्हिआकडून घेण्यांत येणार आहे. ह्या बोटीसाठी ८,६०,००० पौंड किंमत द्यावी लागेल. भारत आणि युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान करण्यांत आलेल्या व्यापारी करारास अनुसरून रुपयांच्या चलनांत किंमत देऊन भारताला माल आयात करतां येतो. ही बोट कलकत्ता येथील रत्नाकर शिपिंग कंपनी विकत घेणार आहे. बोट कंपनीच्या ताब्यांत मिळाल्यावर कंपनीनें ८० टक्के किंमत चुकती करावयाची आहे. उरलेली वीस टक्के किंमत तीन सारख्या वार्षिक हप्त्यांनीं चुकती करावयाची आहे. हप्त्यावर ५ टक्के व्याज घेण्यांत यणार आहे. कलकत्ता येथील हिंद लाइन्स ही कंपनी दुसरी बोट विकत घेणार आहे. ती जुनी आहे व तीसाठी कंपनीला १,२०,००० पौंड किंमत द्यावी लागणार आहे. बोटीच्या किंमतीच्या २० टक्के रक्कम रोख देण्यांत यावयाची आहे भारत सरकार तेवढें परदेशीय चलन मंजूर करणार आहे. उरलेली किंमत ४ सारख्या वार्षिक हप्त्यांनीं द्यावयाची आहे. तिसरी बोट मुंबईमधील एक कंपनी विकत घेणार आहे. ही बोट जुनीच असून तीसाठी १,२०,००० पौंड किंमत द्यावी लागणार आहे. बोट घेण्यासाठी लागणारें परदेशीय चलन मंजूर करण्यांत आलें आहे. बोटीसाठी कांहीं किंमत ताबडतोब द्यावी लागेल. उरलेली किंमत बोट जें परदेशीय चलन मिळवील त्यामधून ४ वर्षांत द्यावयाची आहे. भारताच्या व्यापारी नौकादलांत आणखी तीन बोटींची भर पडणार आहे.

### आसाममधील खनिज तेलाचा शोध

भारत सरकार आणि बर्मा ऑईल कंपनी ह्यांनीं पुरस्कार केलेली ऑईल इंडिआ लि. ही कंपनी आसामच्या उत्तर भागांत खनिज तेलाचा शोध करीत आहे. आतांपर्यंत कंपनीनें तेलाच्या १०० विहिरी खोदलेल्या आहेत. ऑइल इंडिया कंपनी तेलशुद्धीचे दोन कारखाने काढणार असून त्यामधून दरसाल ३० लाख टन अशुद्ध तेलाचें शुद्धीकरण करण्यांत येणार आहे. आतांपर्यंत खोदण्यांत आलेल्या विहिरींपैकी ६८ विहिरींमधून तेल सांपडलें आहे. उत्तर आसाममधील तेलाच्या साठ्याचा अंदाज गेल्या वर्षी एका अमेरिकन कंपनीनें केला होता. कंपनीच्या मतें ह्या भागांत ४·१ कोटी टन तेल सांपडूं शकेल. आतांपर्यंत खोदण्यांत आलेल्या व यशस्वी ठरलेल्या विहिरींपासून ऑइल इंडिया कंपनी दरसाल २० लाख टन अशुद्ध तेलाचा पुरवठा करूं शकेल. नूनमती आणि बरौनी येथील तेलशुद्धीचे कारखाने अनुक्रमें १९६१ व १९६२ मध्यें सुरू होतील असा अंदाज आहे. हे कारखाने सुरू झाले म्हणजे अशुद्ध तेलाचे उत्पादनहि वाढवावें लागेल. कारण ह्या दोन्ही कारखान्यांना मिळून दरसाल सुमारें तीस लाख टन अशुद्ध तेलाचा पुरवठा करावा लागेल. तेलाच्या विहिरींपासून तेलशुद्धीच्या कारखान्यापर्यंत नळानें तेल न्यावें लागेल. नळ घालण्याचें काम चालू आहे. तेलाच्या विहिरी खोदण्याचें काम हें खर्चाचें असतें. कांहीं विहिरी ८,००० ते १०,००० फुटांपर्यंत सुद्धां खणाव्या लागतात. इतकेंहि करून त्यामधून मोठ्या प्रमाणावर तेल मिळूं शकेलच असें सांगतां येत नाहीं. एक विहीर खोदण्यासाठी सुमारें १३ लाख रुपये खर्च येतो. ह्यावरून तेलाचा शोध करण्याचें काम किती खर्चाचें आहे ह्याची कल्पना येऊं शकते.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

**रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर**

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | रु. ३५,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १६ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ६६ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

**— २७ मार्च, १९६१ पासून सुरू झालेल्या १३ नव्या शाखा —**

अर्वी, चांदा, धामणगांव, दुर्ग (मध्यप्रदेश), गोंदिया, हिंगणघाट, पुलगांव, राजनांदगांव (मध्यप्रदेश) वर्धा, वरोरा, वणी, नागपूर (१ धरमपेठ, २ इतवारी)

जनरल मॅनेजर

## चित्रवाणीचा शिक्षणासाठी उपयोग

अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशननें पुरस्कृत केलेलें टेलिव्हिजनच्या तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत येणार आहे. ह्या मंडळांत टेलिव्हिजनचा शिक्षणासाठी कसा उपयोग होऊं शकेल हें जाणणारे तज्ज्ञ आहेत. माध्यमिक शाळांतून चित्रवाणीचा शिक्षणासाठी उपयोग करण्याची एक योजना आंखण्यांत त्यांची मदत घेण्यांत येणार आहे. ही योजना येत्या ऑगस्ट महिन्यांत सुरू करण्यांत येणार असून, प्रथम तिचा लाभ २०० विद्यार्थ्यांनाच घेतां येणार आहे. दर आठवड्याला तीन शैक्षणिक कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत येणार आहेत. प्रत्येक कार्यक्रम २० मिनिटांचा असेल. त्यांच्याद्वारा इंग्रजी व हिंदी ह्या भाषा आणि पदार्थविज्ञान व रसायन हे विषय शिकविण्यांत येतील. दिल्ली येथें सप्टेंबर १९५९ मध्यें दूरचित्रवाणीची स्थापना प्रयोग म्हणून करण्यांत आली. पण ह्या केंद्राच्या कक्षेची व्याप्ति फार अल्प होती. कारण दूरचित्रवाणीला यंत्रसामग्री व पैसा ह्यांची कमतरता होती. पण अलीकडे संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या शैक्षणिक व शास्त्रीय उपसंघटनेनें चित्रवाणीचे सेट्स घेण्यासाठी आणि कार्यक्रम तयार करण्यासाठी २०,००० डॉलर्सची तरतूद केली. त्यामुळें बऱ्याच लोकांना एकत्र येऊन पाहतां येईल अशा तऱ्हेचे टेलिव्हिजन सेट्स घेणें शक्य झालें. टेलिव्हिजन पाहणारे क्लब्स काढण्यांत आले असून त्यांना ६६ सेट्स पुरविण्यांत आले आहेत. टेलिव्हिजनच्या ह्या प्रयोगाला बरेंच यश आल्यामुळें माध्यमिक शाळांतून टेलिव्हिजनचा कसा उपयोग करतां येईल ह्यासंबंधीं विचार सुरू झाला. भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्यानें ह्या कामीं फोर्ड फौंडेशनशीं चर्चा केली. त्याचा परिणाम म्हणून फोर्ड फौंडेशननें सक्रिय सहकार्य करण्याची तयारी दाखविली.

---

## पाकिस्तानामधील आयुर्विमा व्यवहार

पाकिस्तानच्या सरकारनें पोस्टल लाइफ इन्शुरन्स पॉलिसीज चालू करण्याचें ठरविलें आहे. हे विमे देतांना विमा घेणाराची वैद्यकीय तपासणी करण्यांत येणार नाहीं. कांहीं थोडीं बंधनें घालून अशा प्रकारचे आयुर्विमे ग्रामीण भागांतच देण्यांत येणार आहेत. पाकिस्तानच्या ग्रामीण भागांत विमेदारांची वैद्यकीय तपासणी करण्याचें काम बरेंच अवघड जातें. वैद्यकीय तपासणी-करतां विमे देण्यांत आले तर विमा लोकप्रिय होण्यास मदत होईल, अशी सरकारची अपेक्षा आहे. विनावैद्यकीयतपासणी देण्यांत येणाऱ्या आयुर्विम्याची दर्शनी किंमत ५,००० रुपयांपेक्षा अधिक असणार नाहीं. विमा उतरल्यापासून पहिले सहा महिने मृत्यूची जोखीम स्वीकारण्यांत येत नाहीं. ह्या मुदतींत अपघातानें आलेला अगर रोगाच्या साथींत झालेला मृत्यु सोडून इतर प्रकारानें मृत्यु आल्यास भरलेले पैसे विमेदाराच्या कुटुंबाला परत करण्यांत यावयाचे आहेत. विमा उतरल्यापासून १ वर्षाच्या आंत मृत्यु आल्यास विम्याच्या रकमेच्या ३० टक्के व २ वर्षाच्या आंत मृत्यु आल्यास ६० टक्के रक्कम देण्यांत येणार आहे. दोन वर्षांनंतर मात्र पूर्ण रक्कम देण्याची जोखीम पत्करण्यांत येईल. १९ ८ सालापासून पाकिस्तानांत पोस्टल इन्शुरन्सची वाढ १० पटीनें झाली आहे. विमापत्रकांची संख्या ८,००० पासून ७७,२०० पर्यंत वाढली असून, त्यांची दर्शनी किंमत १·५ कोटी रुपयांपासून २२ कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. विम्याच्या हप्त्यांचा विचार करतां पोस्टल इन्शुअरन्सचे हप्ते दर हजारीं ५ ते १० रुपयांनीं कमी असतात. नफ्याच्या वाटणीचा विचार ह्या विम्यावर दर हजारीं १२ ते १८ रुपयांपर्यंत नफा वांटण्यांत येतो.

---


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ११,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंदुके



# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदत ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

१ वर्ष ३¾% — ३ वर्षें ४¼%

२ वर्षें ४% — ४ वर्षें ५%

५ वर्षें ५%

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. — के. डी. शिराळकर, मॅनेजर.

## आयर्लंडमधील नागरिकांचा आहार अधिक सकस

संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे दरसाल प्रसिद्ध होणाऱ्या आंकड्यांवर आधारलेले माहिती-पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. ह्या पुस्तकांतील कांहीं माहिती पुढें दिली आहे. जगांतील कोठल्याहि देशापेक्षा आयर्लंडमधील लोकांचा आहार अधिक सकस आहे. अमेरिकेंत मोटारगाड्या, दूरदर्शक यंत्रें आणि रेडिओ ह्यांची संख्या सर्वांत अधिक आहे. रशिआंतील लोक अधिक चित्रपट पाहतात आणि अधिक पुस्तकें प्रकाशित करतात. ब्रिटनमधील लोक वृत्तपत्रें वाचण्यांत आघाडीवर आहेत. आहारासंबंधीं विचार करतां आयर्लंडमधील लोक रोज ३,२०० कॅलरीज उष्णता उत्पन्न करणारा आहार घेतात. त्यांच्या खालोखाल असे अनुक्रम आहेत पश्चिम जर्मनी २,८९० कॅलरीज; पाकिस्तान १,८१०; भारत १,८००; इटली २,६५०; जपान २,२१०; हॉलंड २,९६०; फिलिपाइन्स १,९८०; पोर्तुगाल २,४१०; स्पेन २,५०८; अमेरिका ३,१००. १९५९ मध्यें अमेरिकेंत दर १००० प्रवाशांमागें ३३५ मोटारी होत्या. ऑस्ट्रेलियांत १७७ होत्या, फ्रान्समध्यें १११ होत्या, पश्चिम जर्मनींत ७० होत्या. इटलींत ४० होत्या व जपानमध्यें ३ होत्या. अमेरिकेंत १६.९ कोटी रेडिओ होते. रशिआंत ४ कोटी होते, पश्चिम जर्मनींत १.६ कोटी होते, जपान व ब्रिटनमध्यें १.५ कोटी होते, व फ्रान्समध्यें १.१ कोटी होते. अमेरिकेंतील दूरदर्शक यंत्रांची संख्या ५.३ कोटी होती; ब्रिटनमधील १ कोटी होती. रशिआंतील २६ लाख होती; जपानमध्यें ३३ लाख होती; इटलीमधील १६ लाख होती आणि फ्रान्समधील १४ लाख होती. रशिआनें ६९,०७२ पुस्तकें प्रसिद्ध केलीं. जपाननें २४,१५२ प्रसिद्ध केलीं. ब्रिटननें २०,६०० प्रसिद्ध केलीं. अमेरिकेनें १४,९७६ प्रसिद्ध केली. फ्रान्सनें १२,१३२ व भारतानें ११,९७९ प्रसिद्ध केलीं.

---

## अंबोलीं येथील विश्रामकेंद्राचें उद्‌घाटन

सावंतवाडीपासून २० मैलांवर अंबोली येथें एका नव्या विश्राम-केंद्राचें उद्‌घाटन नुकतेंच करण्यांत आलें. कमी उत्पन्न असलेल्या लोकांचा शिणवटा घालविण्यासाठी केंद्राची स्थापना करण्यांत आली आहे. सह्याद्रि पर्वताच्या माथ्यावर असलेल्या ह्या थंड हवेच्या ठिकाणाची महाराष्ट्र सरकारनें मुद्दाम निवड केली आहे. ह्या ठिकाणाची उंची समुद्रसपाटीपासून २,३७६ फूट आहे. महाराष्ट्र सरकारनें १ लाख, ६१ हजार रुपये खर्चून येथें एक विश्रांतिस्थान बांधलें आहे. ह्या इमारतींत १३ स्वतंत्र बिऱ्हाडांची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. सुमारें ७० ते ८० लोकांना अगदीं अद्यावत् पद्धतीनें येथें राहतां येईल. महाराष्ट्र राज्यांत अशा तऱ्हेचीं १२ विश्रांतिस्थानें आहेत. आणखी दोन विश्रांतिस्थानांची उभारणी करण्याचें काम चालू आहे. ह्या ठिकाणीं येणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी व केंद्राची व्यवस्था पाहण्यासाठी एका संघटकाची नेमणूक लवकरच करण्यांत येणार आहे. अंबोली येथील विश्रांतिकेंद्राला लोकांकडून चांगली साद मिळत आहे. त्यामुळें आणखी ४ किंवा ५ कुटुंबांची राहण्याची सोय करण्याचा सरकारचा विचार आहे. सावंतवाडी-पासून अंबोलीला जाण्यासाठी मोटारींची सोय आहे. पण ही अधिक चांगली करण्यांत येणार आहे. अंबोली येथील कांहीं जमिनी भाड्यानें अगर विकत देऊन त्या लोकांना लहान लहान झोपड्या बांधण्यासाठी देण्याचा सरकार विचार करीत आहे. अशा खाजगी मालकीच्या झोपड्या बांधण्यांत आल्या तर विश्रांतिस्थानांत अधिक लोकांची सोय होऊं शकेल. अंबोली येथील विश्रांतिस्थानांतील बिऱ्हाडांचें दररोजचें भाडें २ ते ३ रुपये आहे. पण तें आणखी कमी करण्यांत येण्याची शक्यता आहे.

---

## साखरेसंबंधीं संशोधनाचीं विभागीय केंद्रें

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत साखरेसंबंधीं संशोधन करणारीं विभागीय केंद्रें स्थापन करण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. सध्यां कानपूर येथें अशी एक संशोधन संस्था आहे. तथापि निरनिराळ्या राज्यांतील साखरेच्या धंद्याचे प्रश्न कांहींसे वेगळ्या स्वरूपाचे असल्यानें कानपूर येथील संस्थेला योग्य सल्ला देणें अवघड जात आहे. म्हणून भारत सरकारच्या अन्न व शेतकी खात्याच्या शुगर डेव्हलपमेंट कौन्सिलनें विभागीय संशोधन केंद्रें काढण्याची एक योजना तयार केली आहे. तिला निश्चित स्वरूप लवकरच दिलें जाणार आहे. कानपूर येथील संस्था साखरेच्या धंद्याच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचें काम चालूच ठेवणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत साखरेच्या उत्पादनाचें उद्दिष्ट वाढविण्यांत आलें आहे. तें गांठण्यासाठी आणखी नवीन साखर-कारखानेहि काढण्यांत येणार आहेत. त्यामुळें विभागीय संशोधन-केंद्रांची आवश्यकता अधिकच भासूं लागणार आहे. सध्यां चालू असलेले साखर कारखाने दरसाल २६ लाख टन साखर निर्माण करूं शकतील. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उत्पादनाचें उद्दिष्ट ३५ लाख टन ठरविण्यांत आलें असून, आणखी ९ लाख टन साखर निर्माण करण्यासाठी ६ नवे कारखाने काढण्यांत यावयाचे आहेत. तिसऱ्या कार्यक्रमांत २० सहकारी साखर कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी १४ कारखान्यांना परवाने देण्यांत आले आहेत. ६ खाजगी कारखान्यांनाहि परवाने देण्यांत आले आहेत. पहिल्या व दुसऱ्या कार्यक्रमांत ३८ सहकारी कारखान्यांना परवाने देण्यांत आले होते. पण, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस फक्त २४ कारखानेच प्रत्यक्ष उत्पादन करूं लागले होते परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें यंत्र-सामग्री आयात करण्यांत अडचणी आल्या.

---

## खताच्या कारखान्यांचें कॉर्पोरेशन

भारतामधील सार्वजनिक मालकीच्या खताच्या पांच कार-खान्यांचा कारभार पाहण्यासाठी एका कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आहे. सध्यां सिंद्री आणि नांगल येथील कारखा-नेंच फक्त चालू आहेत. ट्रॉम्बे, नाहारकटिआ आणि गोरखपूर येथील खताचे कारखाने अद्याप चालू व्हावयाचे आहेत. नेवेली आणि रूरकेला येथें काढण्यांत यावयाचे कारखानेहि कॉर्पोरेशन-च्या अखत्यारांत देण्यांत येण्याचा संभव आहे. चालू असलेल्या कारखान्यांतील अनुभवाचा फायदा नव्या कारखान्यांना मिळावा आणि साधनसंपत्तीचा अधिक चांगला वापर करतां यावा म्हणून कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आहे.

---

## ओखला पॉलिटेक्निकला पंतांचें नांव

ओखला येथील पॉलिटेक्निकला कै. श्री. गोविंद वल्लभ पंत यांचें नांव देण्यांत यावें ही दिल्ली शासनयंत्रणेनें केलेली सूचना भारत सरकारनें स्वीकारली असल्याचें समजतें.

---

## जांबगांवची ग्रामपंचायत

लेखक :—वा. कृ. कोगेकर, एल. एजी.

[ चित्रशाळा प्रकाशन, पृ. संख्या ३३. किंमत रु. ०-७५ ]

महाराष्ट्रांतील खेड्यांच्या सुधारणेची दिशा दर्शविणाऱ्या ह्या पुस्तकांत श्री. वा. कृ. कोगेकर ह्यांनीं आपल्या अनुभवांच्या आधारें उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आहे. कमी पावसाच्या व दुष्काळी भागांतील 'जांबगांव' हें कोरडवाहू शेतीवर उपजीविका करणाऱ्यांचें काल्पनिक गांवठाण सहकारानें कसें उर्जितावस्थेस आलें, ह्याची हकीकत श्री. कोगेकर ह्यांनीं अगदीं सोप्या भाषेंत सांगितली आहे. 'प्रत्येक शेतकऱ्यास शेतींत चालू असलेल्या सुधारणासंबंधीं माहिती असण्याची अत्यंत जरूरी आहे; शेतीची प्रगति करून हिशेब, जमाखर्च ठेवणेंहि जरूर आहे आणि तें शिक्षणामुळेंच होऊं शकेल' ह्याविषयीं गांवांतील तरुणांत एकवाक्यता होऊन विद्यामंदिराची स्थापना करण्यांत आली, येथून श्री. कोगेकरांच्या गोष्टीस प्रारंभ झाला आहे. पाण्याची सोय करण्यासाठीं धरण बांधायचें ठरलें आणि जत्रेंत वेळ न घालवतां बांधकामासाठीं बैलगाड्या व श्रम गांवकऱ्यांनीं दिले. गांवकऱ्यांत आत्मविश्वास निर्माण होऊन गांव सुधारणेचीं आणखी कामें हातीं घेण्यासाठीं ग्रामपंचायतीची स्थापना झाली. गांवांतील स्वच्छता व साफसफाई, जत्रेच्या वेळीं यात्रेकरूंची सोय, प्राणिहत्येला बंदी, इत्यादींमुळें सहकाराची भावना आणखी वाढीस लागली. ग्रामपंचायतीच्या कामांत स्त्रियांनीं भाग घेतला, तर पुरुषांना बाहेरच्या कामाला जास्त वेळ मिळेल, हा विचार सर्वांना पसंत पडला आणि सौ. द्रौपदीबाई माने ह्यांची सरपंच म्हणून निवड झाली. बालवाडी, देवीच्या यात्रेस नवें वळण, जनावरांच्या साथीच्या रोगांचा प्रतिबंध, जमिनीच्या ताली व बांध–बंदिस्ती, त्यामुळें निर्माण झालेली सुबत्ता, सहकारी साखर कारखान्याची स्थापना, शाळेस नवी इमारत, दूध–केंद्र, इत्यादि प्रकरणांतून गांवाच्या उत्कर्षाची वाटचाल दिसून येते. "सर्वांत महत्त्वाचें काम म्हणजे शेतीची सुधारणा, ओढ्यास धरणें बांधणें, शेतास ताली घालणें, कंपोस्ट पद्धतीनें खत तयार करणें, पिकांच्या उत्पन्नांत वाढ करून सांपत्तिक स्थिति सुधारणें आणि उद्योगधंद्यांत पैसे गुंतविण्याची दृष्टि निर्माण करणें" हा लेखकाचा मनांतला हेतु जांबगांवच्या ग्रामपंचायतीनें परस्पर सहकार्यानें कसा सिद्धीस नेला, हें ह्या छोट्या पुस्तकांत दाखविण्यांत आलें आहे. इच्छा व सहकारी वृत्ति असेल, तर आपला उत्कर्ष आपल्याच हातीं आहे हें ह्या पुस्तकाच्या वाचनानें सहज पटतें. ज्याला जें चांगलें करतां येईल तें त्यानें करून इतरांच्या कामासहि हातभार लावावा आणि सामुदायिक हिताच्या द्वारां स्वतःचा उत्कर्ष साधावा हा श्री. कोगेकर ह्यांच्या पुस्तकाचा संदेश आहे.

---

### रशिआंतील कापडाच्या धंद्याचा अभ्यास

रशिआंतील कापड–गिरण्यांच्या धंद्याचा अभ्यास करण्यासाठीं १३ जणांचें एक मंडळ रशिआला जाणार आहे. रशिआच्या सरकारकडून बोलावणें आल्यावरून राष्ट्रीय उत्पादन मंडळानें तें पाठविण्याचें ठरविलें आहे. मंडळ रशिआचा १ महिन्याचा दौरा करील व कापड–गिरण्यांच्या तांत्रिक व द्रव्यविषयक संघटनेचा अभ्यास करील. मंडळांत मजुरांचे दोन प्रतिनिधी असतील. त्याशिवाय कापड गिरण्यांच्या यंत्रसामग्रीचा एक तज्ज्ञहि असेल. भारतामधील कापड गिरण्यांच्या धंद्यांतर्फे कम्युनिस्ट देशाला भेट देणारें हें पहिलें मंडळ आहे. गेल्या तीन–चार वर्षांत रशिआच्या कापड–गिरण्यांनीं खूपच प्रगति केलेली आहे.


टेलिफोन नं. २४८३. तार :

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

इकडे वेळींच लक्ष द्या……….

आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत रहा.

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | … | … | ४ टक्के |
| २ वर्षे | … | … | ४। टक्के |
| ३ वर्षे | … | … | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | … | … | २॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठीं कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

बा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.



# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५

पोस्ट बॉक्स नं. ७७२ तारेचा पत्ता–कार्मबँक

मुख्य कचेरी– ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठीं चौकशी करावी.

चिं. द. दाते, कार्यकारी संचालक.

### सरकारी मालकीची मोठ्या प्रमाणावरील शेती

महाराष्ट्र राज्य-सरकारनें जमीन धारणा विधेयक मंजूर करून जमिनीच्या मालकीवर कमाल मर्यादा घातली आहे. त्यानंतर आतां सरकारी मालकीचें एक विस्तीर्ण शेत स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांना जमीन धारणा कायदा लागू करण्यांत आल्यामुळें जी वरकड जमीन सरकारकडे येईल त्यामधून ह्या शेतीची निर्मिति करण्यांत येणार आहे. राज्यांतील साखर कारखान्यांकडे असलेल्या जमिनीसंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करण्याचें काम एका खास अधिकाऱ्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. ह्यासंबंधींच्या कामकाजाची कचेरी पुण्यास राहणार आहे. साखर कारखान्यांतील कामगार, तंत्रज्ञ, शेतकी व इतर अवजारें, इत्यादिसंबंधी माहिती गोळा करण्यांत येणार आहे. संकल्पित शेतींत ३०,०० ० एकर जमिनीचा समावेश करण्यांत येईल. अखेर तिचें सहकारी शेतींत रूपांतर करण्यांत येईल.

---

### तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांतील किंमती

भारताच्या राष्ट्रीय विकास मंडळानें अशी सूचना केली आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत वस्तूंच्या किंमती स्थिर राखण्यासाठीं विशेष प्रयत्न करण्यांत यावा. त्यासाठीं देशांत ५० लाख टन अन्नधान्याचा सांठा करण्यांत यावा. त्यामुळें अन्नपदार्थांच्या किंमती स्थिरावणें शक्य होईल व इतर वस्तूंच्या किंमती स्थिरावण्यास मदत होईल. अन्नधान्याशिवाय कापूस, ताग ह्यांसारख्या औद्योगिक कच्च्या मालाचाहि सांठा कांहीं प्रमाणांत करण्यांत यावा. शेतीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीं सरकारनें शेतीच्या मालाच्या किमान किंमती ठरवाव्या व बाजारपेठेंत उतरावें. बाजारांत सरकारी खरेदी होण्याची शक्यता दिसली कीं भावांत चढउतार होणें कठीण जातें, असा अनुभव आहे.

---


## Deccan Institute of Commerce

717, Budhwar Peth, Opp.—Jijamata Garden, Poona 2.

Estd.—1918.] [Telephone No. 2360.

Opens for the New 1961-62 year on Friday, 23rd June, 19 1. Students coached up for G. C. D., D. Com., G. D. C. and A., Costing, Company Secretary, Insurance, Banking, Accountancy, Shorthand, Typewriting and External Pre-Degree Commerce and B. Com. Degree Courses and 3 Months' Bankers Practical Training Course.

Morning and Evening Classes ] [ Prospectus Free.


---

## Fergusson College, Poona 4.

The College will open for the new year on the 20th June, 1961. Gujarati has been introduced as an optional language at the B. A. (Gen.) level with effect from June, 1961.

D/-31-5-1961. — *Principal.*

## पुणें सहकारी विद्यालय, पुणें १

१० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १

### कोऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा-मार्च १९६१

परीक्षेंत खालील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत:—

**पहिला वर्ग:**—कोणी नाहीं.

**दुसरा वर्ग:**—पी. आर. बागाव, एस. एन. गोखले, आर. के. जेरे, पी. डी. दांगट, एन. टी. गुज्जा, पी. एस. पाटील, जे. आर. शहा.

**तिसरा वर्ग:**—एम. व्ही. घोले, बी. एस. जाळिंद्रे, एस. बी. जोशी, एन. बी. देशमुख, एस. बी. देशमुख, व्ही. के. देशमुख, जी. एस. कण्हेरकर, ए. एम. कारेकर, जी. एच. कोरे, बी. डी. लाड, एस. एस. म्हैत्री, ए. आर. पाटील, एस. एस. सातमकर, बी. डी. शेटे, एम. एस. शेट्टी, बी. पी. शिंदे, एच. आर. शिंदे. एस. बी. आखवे, आर. व्ही. जोशी, एम. एस. खडद्कर, बी. एस. महाजन, डो. एम. नागटिळक; डी. जी. पाटील, आर. जे. सावे.

टीप:—पुढील विद्यार्थ्यांनीं अनुक्रमें पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाचें पारितोषिक मिळविलें आहे:—

| पारितोषिकाचें नांव | विद्यार्थ्याचा नांव व नंबर | बक्षिसाची रक्कम |
|---|---|---|
| (१) सर जनार्दन ए. मद्न पारितोषिक | क्र. पी. ५७ श्री. शहा जे. आर. | रु. २५ |
| (२) बॉम्बे को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स सोसायटी, पारितोषिक | क्र. पी. ६ श्री. गोखले एस. एन. | रु. १५ |

परीक्षेस बसलेल्या एकूण ( एक्स स्टुडंटस् धरून ) ९५ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थी सदर परीक्षेंत उत्तीर्ण झाले असून, उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें शेंकडा प्रमाण ३२·६ एवढें आहे.

आर. पी. देशमुख
प्रिन्सिपॉल,
पुणें सहकारी विद्यालय, पुणें.

पुणें
दि. ३ जून १९६१

---

### "आपला वेळ कसा वाचवाल?"

श्री. श्री. वा. काळे ह्यांचें वरील विषयावर आकाशवाणीच्या पुणें केंद्रावरून, बुधवार दि. ७ रोजीं दुपारीं गृहिणींच्या कार्यक्रमांत भाषण ध्वनिक्षेपित होणार आहे.


## कौटुंबिक हितगुज

श्री. वा. काळे ह्यांनीं अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या लेखमालेनें 'किर्लोस्कर'च्या हजारों वाचकांची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख एकत्रित केलेला संग्रह 'किर्लोस्कर प्रेस'तर्फे प्रसिद्ध होत आहे.

पृ. सं. अंदाजें ११२] [किंमत ३ रु.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

**मनगटी घड्याळांची नांवें**—हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यांत बनविण्यांत येणारीं मनगटी घड्याळें चालू वर्षाच्या अखेरीपर्यंत बाजारांत येतील अशी अपेक्षा आहे. कारखान्याला जपानकडून तांत्रिक साह्य मिळालेलें आहे. तयार होणाऱ्या घड्याळांपैकी स्त्रियांच्या एका प्रकारच्या घड्याळाचें नांव 'सुजाता' असें ठेवण्यांत येणार आहे. कारखान्यांत काम करणाऱ्या एका स्त्री कामगाराचें हें नांव आहे. स्त्रियांच्या इतर घड्याळांचीं नांवें पद्मजा, प्रेम व कमला आणि पुरुषांच्या घड्याळांची नांवें जनता, मार्स व चार्म अशीं आहेत.

**सुपरफॉस्फेटचा कारखाना**—मध्यप्रदेशांतील दुग जिल्ह्यांत सुपरफॉस्फेट तयार करण्याचा एक कारखाना लवकरच उभारण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा असेल. कारखाना व त्यासाठी लागणाऱ्या इतर इमारती ह्यांच्यासाठी लागणारी जागा राज्य सरकार देणार आहे. सुमारें १० एकर जागा त्यांच्या मालकांकडून काढून घेऊन सरकार आपल्या ताब्यांत घेत आहे.

**परदेशीय चलनांचा काळा बाजार** दिल्लीमधील कॉनॉट सर्कस ह्या भागांतील एका कंपनीच्या कचेरीवर पोलिसांनीं छापा घातला. ही कंपनी परवाना नसतांना परदेशीय चलनांचे व्यवहार करीत असते अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. कंपनीच्या कचेरींत पोलिसांना प्रवाशांचे चेक्स व डॉलर्स मिळून २५,००० रुपयांचें परदेशीय चलन मिळालें. त्याशिवाय १५,००० रुपयांच्या भारताच्या नोटाहि सांपडल्या.

**निराधार स्त्रियांना कामधंदा**—मध्यवर्ती समाजहितवर्धन-बोर्डाच्या अध्यक्ष श्रीमती दुर्गाबाई देशमुख ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, बोर्डातर्फे चालविण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या योजनांत ३५,००० निराधार स्त्रियांना कामधंदा पुरविण्यांत आला. देशांतील स्त्रियांपैकी अवघ्या ८ टक्के स्त्रिया साक्षर आहेत अशीहि माहिती त्यांनीं दिली.

**वैद्यकीय हत्यारांचा कारखाना**—मद्रासजवळ वैद्यकीय हत्यारें तयार करण्याचा सार्वजनिक मालकीचा कारखाना रशिया-च्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्याचा नकाशा रशिअन तंत्रज्ञांनीं आतां पूर्ण केला आहे. कारखान्यांत दरसाल निरनिराळ्या प्रकारचीं सुमारें २५ लाख हत्यारें व उपकरणें तयार करण्यांत येतील. कारखान्यासाठी लागणारीं यंत्रसामग्री रशिआ पुरविणार आहे.

**हत्तींना मारण्यावरील बंदी**—उत्तर प्रदेशांत जंगली हत्तींना मारण्यास मनाई करणारा हुकूम गेलीं ५० वर्षे चालू आहे. पण आतां ही बंदी उठविली जाण्याचा संभव आहे. ह्या हत्तींमुळें अलीकडे पिकांना व मळ्यांना बरीच हानि सोसावी लागत आहे. परदेशीय प्रवाशांकडून फी घेऊन हत्तींची शिकार करण्याची परवानगी देण्यांत यावी असें सुचविण्यांत येत आहे. त्याचबरोबर आशिआंतील पूर्वेकडील देशांत हत्तींना बाजारपेठ मिळविण्याचीहि खटपट करण्यांत येणार आहे.

**कसोटी सामन्याचीं आगाऊ तिकिटें**—इंग्लंड व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या क्रिकेटसंघांतील चालू दौऱ्यांतील पहिला कसोटी सामना बर्मिंगहॅम येथें ता. ८ जून रोजीं होणार आहे. ह्या सामन्याचीं २८,००० पौंड किंमतीचीं तिकिटें आगाऊ खपलीं आहेत. सामना ६ दिवसांचा असून तो पाहण्यासाठीं दररोज २५,००० प्रेक्षक हजर राहतील असा अंदाज आहे १९५७ सालापेक्षा ही विक्री ९,००० पौंडांनीं अधिक आहे.

**बिहार राज्याचा पंचवार्षिक कार्यक्रम**—बिहार राज्य सरकारनें आपल्या पंचवार्षिक कार्यक्रमाची आंखणी करतांना तीन ध्येयें ठरविलीं आहेत. (१) मोठ्या व छोट्या उद्योगधंद्यांत समतोलपणा राखणें, (२) रोजगाराच्या अधिक संधि निर्माण करणें आणि (३) अधिक औद्योगिक वसाहती स्थापन करणें. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील कामासाठी बिहारच्या सरकारनें १४·३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**चीनजवळ लवकरच अणुबॉंब**—'जपान टाइम्स' ह्या वृत्तपत्रानें अशी माहिती प्रसिद्ध केली आहे कीं, पुढील सालच्या वसंत ऋतूंत चीनजवळ स्वतःच्या बनावटीचा अणुबॉंब असण्याची शक्यता आहे. हें पत्र जपानच्या सरकारी गटांतील आहे. जपान-च्या सरकारनें व संरक्षण खात्यानें अणुबॉंबच्या साह्यानें संरक्षणाची तयारी करावी अशी सूचनाहि पत्रानें केली आहे.

**बिर्ला ह्यांची मॉस्कोला भेट**—रशिआच्या व्यापारखात्याचे प्रमुख मि. नेस्टेरॉव्ह ह्यांच्या निमंत्रणावरून सुप्रसिद्ध हिंदी उद्योग-पति जी. डी. बिर्ला मॉस्कोला गेले आहेत. तेथें ते म्हणाले कीं, भारत-रशिआ ह्यांच्या दरम्यानचा व्यापार आणखी वाढविण्यांत आला तर उभयता देशांच्या हिताचें होईल.

**फिरत्या दवाखान्यांची देणगी**—अमेरिकेंतील 'केअर' ह्या संघटनेतर्फे आणखी दोन फिरत्या दवाखान्यांची देणगी मिळणार आहे. एक दवाखाना डोळ्यांचा असून तो दावणगिरी येथील डॉ. मोदी ह्यांच्या डोळ्यांच्या फिरत्या इस्पितळाला देण्यांत येईल. दुसरा मोटारीवरील दवाखाना कोल्हापूरजवळील मौनी विद्यापीठाला देण्यांत येईल. ह्या दवाखान्यांतून गर्भवती स्त्रियांना प्रसूतिपूर्व सल्ला व औषधें देण्यांत येतील.

**प्रेक्षणीय स्थळांची आकर्षकता**—विजापूर येथें बरीच इतिहासकालीन प्रेक्षणीय स्थळें आहेत व तीं पाहण्यासाठी हौशी प्रवाशांची गर्दी नेहमीच होत असते. मध्यवर्ती सरकारच्या पुराण-वस्तु खात्यानें हीं स्थळें आतां अधिक आकर्षक केलीं आहेत. गोल घुमट, इब्राहिम रोझा, इत्यादि ठिकाणीं आतां चांगली हिरवळ तयार करण्यांत आली आहे. त्याशिवाय प्राचीन इमारतीं-च्या डागडुगीकडेहि अधिक लक्ष पुरविण्यांत येत आहे.

**वाईट मार्क मिळाल्याचा परिणाम**—मुंबईमधील पंधरा वर्षांचा एक मुलगा एका इटालिअन बोटीवर कोणाच्या नकळत चढला व जिनोआला पोंचला. पोलिसांनी त्याला किनाऱ्यावर येऊं दिलें नाहीं. कारण त्याच्याजवळ पासपोर्ट नव्हता. पोलिसांनीं अधिक चौकशी केली, तेव्हां वाईट मार्क मिळाल्यामुळें पळाल्याचें त्यानें सांगितलें. तथापि, बोट इतकी दूरवर जाणारी असेल अशी त्याची कल्पना नव्हती.

**अंतराळांतून पृथ्वीप्रदक्षिणा**—पृथ्वीच्या कक्षेत फिरणारा माणूस बसविलेला आणखी एक उपग्रह रशिआ लवकरच अंतराळांत सोडणार आहे, अशी वार्ता आहे. ह्या अंतराळ प्रवासांत दोन किंवा तीन माणसें धाडण्यांत येतील व तीं आपल्या आकाशयानांतून पृथ्वीभोंवती अनेक भ्रमणें करतील असा संभव आहे. तसें झाल्यास अमेरिकेची प्रतिष्ठा आणखी कमी होईल.

**सुशिक्षित बेकारांना मदत**—सुशिक्षित बेकारांना मदत करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें ३ कोटी रुपये खर्च येणारी एक योजना आंखली आहे. ह्या योजनेप्रमाणें शिक्षित बेकारांना शिक्षकांचें शिक्षण देण्यांत येईल. सुमारें ४०० बेकारांना शिक्षकांच्या नोकऱ्या देण्याचा सरकारचा विचार आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.